जनसंपर्क कक्ष

0 6 MAR 2024 पुढारी शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# बॅडमिंटन स्पर्धेत तंत्रज्ञान विभाग प्रथम; बुद्धिबळात सावळकर, गोस्वामी विजेते

**शिवाजी विद्यापीठ 'शिवस्पंदन' क्रीडा स्पर्धा**

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठात सुरू असलेल्या चारदिवसीय मशिवस्पंदनफ क्रीडा महोत्सवात पहिल्या दिवशी झालेल्या बॅडमिंटन स्पर्धेत तंत्रज्ञान अधिविभागाने प्रथम क्रमांक पटकावला. बुद्धिबळ स्पर्धेत क्रीडा अधिविभागाचा आदित्य सावळकर व तंत्रज्ञान अधिविभागाची प्रतीक्षा गोस्वामी विजेते ठरले.

शिवस्पंदन क्रीडा महोत्सवात (दि. ४) पहिल्या दिवशी क्रीडा अधिविभागाच्या हॉलमध्ये पुरुषांच्या बॅडमिंटन स्पर्धा पार पडल्या. स्पर्धेत अठरा संघांनी सहभाग नोंदविला. स्पर्धेत तंत्रज्ञान अधिविभाग, स्कूल ऑफ नॅनो सायन्स अँड टेक्नॉलॉजी व ॲग्रोकेमिकल्स अँड पेस्ट मॅनेजमेंट अधिविभागाने यश मिळवले.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात आयोजित शिवस्पंदन क्रीडा महोत्सवांतर्गत क्रिकेट स्पर्धेचे फलंदाजी करून उद्घाटन करताना कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के

विद्यार्थी वसतिगृहाच्या सभागृहात पुरुष व महिला गटाच्या बुद्धिबळ स्पर्धा पार पडल्या. स्पर्धेत पुरुष गटात ८० जणांनी तर महिला गटात ३२ जणींनी सहभाग घेतला. स्पर्धेचा निकाल अनुक्रमे असा : पुरुष गट : आदित्य सावळकर (क्रीडा अधिविभाग), धैर्यशील सरनोबत (तंत्रज्ञान अधिविभाग), राहुल लोखंडे (राज्यशास्त्र अधिविभाग). महिला गट : प्रतीक्षा गोस्वामी (तंत्रज्ञान अधिविभाग), पूनम वानोळे (पर्यावरण अधिविभाग), शुभांगी जगताप (पर्यावरण अधिविभाग). तत्पूर्वी, क्रीडा अधिविभागाच्या मैदानावर क्रिकेट स्पर्धेचे उद्घाटन कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के व प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्या हस्ते झाले. दोघाही मान्यवरांनी फलंदाजी केली. दोघांच्या शैलीदार फटकेबाजीने उद्घाटन रंगतदार स्वरूपाचे झाले.

यावेळी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. प्रकाश गायकवाड, क्रीडा संचालक डॉ. शरद बनसोडे यांनी गोलंदाजी व क्षेत्ररक्षण करीत खेळाडूंचा उत्साह वृद्धिंगत केला.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
06 MAR 2024
लोकमत



शिवाजी विद्यापीठात आयोजित शिवस्पंदन क्रीडा महोत्सवांतर्गत क्रिकेट स्पर्धेत फलंदाजी करून कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी उद्घाटन केले.

# बॅडमिंटनमध्ये तंत्रज्ञान अधिविभाग प्रथम

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठात सुरू असलेल्या चार दिवसीय शिवस्पंदन क्रीडा महोत्सवात पहिल्या दिवशी झालेल्या बॅडमिंटन स्पर्धेत तंत्रज्ञान अधिविभागाने प्रथम क्रमांक पटकावला. तर बुद्धिबळ स्पर्धेत क्रीडा अधिविभागाचा आदित्य सावळकर आणि तंत्रज्ञान अधिविभागाची प्रतीक्षा गोस्वामी विजेते ठरले.

क्रीडा अधिविभागाच्या हॉलमध्ये पुरुषांच्या बॅडमिंटन स्पर्धा पार पडल्या. यात अठरा संघांनी सहभाग नोंदविला. स्पर्धेचा अंतिम निकाल असा- तंत्रज्ञान अधिविभाग, स्कूल ऑफ नॅनो सायन्स अँड टेक्नॉलॉजी व अ‍ॅग्रोकेमिकल्स अँड पेस्ट मॅनेजमेंट अधिविभाग.

विद्यार्थी वसतिगृहाच्या सभागृहात पुरुष व महिला गटाच्या बुद्धिबळ स्पर्धा पार पडल्या. या स्पर्धेत पुरुष गटात ८० जणांनी तर महिला गटात ३२ जणींनी सहभाग घेतला. या स्पर्धेचा निकाल असा : पुरुष गट: आदित्य सावळकर (क्रीडा अधिविभाग), धैर्यशील सरनोबत (तंत्रज्ञान अधिविभाग), राहुल लोखंडे (राज्यशास्त्र अधिविभाग). महिला गट : प्रतीक्षा गोस्वामी (तंत्रज्ञान अधिविभाग), पूनम वानोळे (पर्यावरण अधिविभाग), शुभांगी जगताप (पर्यावरण अधिविभाग).

तत्पूर्वी, क्रिकेट स्पर्धेचे उद्घाटन कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के आणि प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांच्या हस्ते झाले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

06 MAR 2024
तरुण भारत

# संशोधक विद्यार्थिनीकडून विद्यापीठास ४० दुर्मिळ नाणी भेट



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाला दुर्मिळ नाण्यांचा संग्रह कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्याकडे सुपूर्द करताना अफसाना मणेरी. सोबत डॉ. सागर डेळेकर, डॉ. प्रतिभा पाटणकर, नईम शेख, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, डॉ. श्रीकांत भोसले.

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाच्या शिक्षणशास्त्र अधिविभागातील पीएच.डी. संशोधक विद्यार्थिनी अफसाना हरूण मणेरी यांनी त्यांच्या संशोधनांतर्गत प्राप्त केलेल्या ४० दुर्मिळ नाण्यांचा संग्रह नुकताच विद्यापीठाकडे सुपूर्द केला. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी तो स्वीकारला.

शिवाजी विद्यापीठाचे संशोधक विद्यार्थी-विद्यार्थिनी काही संदर्भसाधने, वस्तू यांचीही भर विद्यापीठाच्या संग्रहामध्ये घालत असतात. त्यामधील ही एक अतिशय मोलाची देणगी आहे, असे उद्गार कुलगुरू डॉ. शिर्के यांनी काढले.

अफसाना मणेरी यांनी विद्यापीठाच्या शिक्षणशास्त्र अधिविभागातून डॉ. प्रतिभा पाटणकर यांच्या मार्गदर्शनाखाली 'डेव्हलपमेंट ऑफ न्यूमिस्मॅटिक्स ई-कन्टेन्ट मोड्यूल फॉर सेकंडरी टू पोस्ट-ग्रॅज्युएट लेव्हल' या विषयावर पीएच. डी. पदवी घेतली आहे. नाणकशास्त्र हा विषय शिकविण्यासाठी मणेरी यांनी ई-कन्टेन्ट मोड्यूल विकसित केले आहेत. हे संशोधन करीत असतानाच त्यांना वेगवेगळ्या कालखंडातील दुर्मिळ ४० नाणी प्राप्त झाली. ती त्यांनी शिवाजी विद्यापीठाच्या संग्रहालयासाठी भेट दिली. मध्ययुगीन कालखंडातील गोल, चौकोनी आकारातील बहुतांश तांब्याच्या नाण्यांचा यात समावेश आहे.

पर्शियन (फारसी) लिपीतील मजकूर त्यांवर आहे. १.६ ते १६ ग्रॅमपर्यंतच्या वजनाची ही नाणी आहेत. हा संग्रह कुलगुरू डॉ. शिर्के यांनी डॉ. श्रीकांत भोसले यांच्याकडे सुपूर्द केला. यावेळी नाणे अभ्यासक व संग्राहक नईम शेख, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, डॉ. सागर डेळेकर, डॉ. प्रतिभा पाटणकर, डॉ. श्रीकांत भोसले आदी उपस्थित होते

**सल्तनतींच्या कालखंडातील नाणी**

बहामनी (सन १३४७-१५२८ - १३ नाणी, मुघल काळ (१२३५-१५१७)- ९ नाणी, आदिलशाही (१५५८- १६७२)- ५ नाणी, निजामशाही (१५५६- १६३१) -४ नाणी, गोवळकोंडा (१६२६-१६८७), गुजरात सुल्तान (१४११- १५३७), मालवा सुल्तान (१४३६- १५५७) - प्रत्येकी २ नाणी, बिदरशाही (१५०४-१५४२), खान्देश सुल्तान (१५९७-१६०१) आणि जौनपुर सुल्तान (१४४०-१४५६)- प्रत्येकी १ नाणे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
06 MAR 2024
पुढारी



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठासाठी दुर्मिळ नाण्यांचा संग्रह कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के यांच्याकडे सुपूर्द करताना अफसाना मणेरी.

# संशोधक विद्यार्थिनीकडून शिवाजी विद्यापीठास ४० दुर्मीळ नाणी भेट

**● संग्रहालयात संदर्भ साधने, वस्तूंची भर; मणेरी यांचा सत्कार**

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्या शिक्षणशास्त्र अधिविभागातील पीएच.डी. संशोधक विद्यार्थिनी अफसाना हरुण मणेरी यांनी त्यांच्या संशोधनांतर्गत प्राप्त केलेल्या ४० दुर्मीळ नाण्यांचा संग्रह नुकताच विद्यापीठाकडे सुपूर्द केला. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी तो स्वीकारला.

संशोधक विद्यार्थी-विद्यार्थिनी संशोधनाद्वारे बौद्धिक संपदेची भर विद्यापीठाच्या ज्ञानसंग्रहामध्ये घालत असतात. त्यापलीकडे अन्य काही संदर्भ साधने, वस्तू यांची भर विद्यापीठाच्या संग्रहामध्ये घालत असतात. त्यामधील ही मोलाची देणगी आहे, असे उद्गार कुलगुरू डॉ. शिर्के यांनी काढले.

अफसाना मणेरी यांनी विद्यापीठाच्या शिक्षणशास्त्र अधिविभागातून डॉ. प्रतिभा पाटणकर यांच्या मार्गदर्शनाखाली 'डेव्हलपमेंट ऑफ न्यूमिस्मॅटिक्स ई-कन्टेंट मोड्यूल फॉर सेकंडरी टू पोस्ट-ग्रॅज्युएट लेव्हल' या विषयावर पीएच.डी.चे संशोधन पूर्ण केले आहे. नाणकशास्त्र हा विषय शिकविण्यासाठी मणेरी यांनी ई-कन्टेंट मोड्यूल विकसित केले आहेत. हे संशोधन करीत असतानाच त्यांना वेगवेगळ्या कालखंडांतील दुर्मीळ ४० नाणी प्राप्त झाली. ती त्यांनी शिवाजी विद्यापीठाच्या संग्रहालयासाठी भेट दिली. मध्ययुगीन कालखंडातील गोल, चौकोनी आकारातील बहुतांश तांब्याच्या नाण्यांचा यात समावेश आहे. पर्शियन (फारसी) लिपीतील मजकूर त्यांवर आहे. १.६ ते १६ ग्रॅमपर्यंतच्या वजनाची नाणी आहेत.

मणेरी यांनी दिलेला संग्रह कुलगुरू डॉ. शिर्के यांनी विद्यापीठाच्या म्युझियम कॉम्प्लेक्सचे समन्वयक डॉ. श्रीकांत भोसले यांच्याकडे सुपूर्द केला.

यावेळी नाणे अभ्यासक व संग्राहक नईम शेख यांच्यासह प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, डॉ. सागर डेळेकर, डॉ. प्रतिभा पाटणकर, डॉ. श्रीकांत भोसले उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
0 6 MAR 2024 सकाळ शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# अफसाना मणेरी यांनी दिली विद्यापीठाला ४० दुर्मिळ नाणी

सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. ५ : शिवाजी विद्यापीठाच्या शिक्षणशास्त्र अधिविभागातील पीएच.डी. संशोधक विद्यार्थिनी अफसाना हरुण मणेरी यांनी त्यांच्या संशोधनांतर्गत प्राप्त केलेल्या ४० दुर्मिळ नाण्यांचा संग्रह विद्यापीठाकडे सुपूर्द केला. त्याचे स्वागत कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी केले.

'विद्यापीठाचे संशोधक विद्यार्थी-विद्यार्थिनी आपल्या संशोधनाद्वारे बौद्धिक संपदेची भर विद्यापीठाच्या ज्ञानसंग्रहामध्ये घालत असतात. पण, त्यापलीकडेही अन्य काही संदर्भसाधने, वस्तू यांचीही भर विद्यापीठाच्या संग्रहामध्ये घालत असतात. त्यामधील ही एक अतिशय मोलाची देणगी आहे,' असे कुलगुरू डॉ. शिर्के यांनी सांगितले.

अफसाना यांनी विद्यापीठाच्या शिक्षणशास्त्र अधिविभागातून डॉ. प्रतिभा पाटणकर यांच्या मार्गदर्शनाखाली 'डेव्हलपमेंट ऑफ न्यूमिस्मॅटिक्स ई-कन्टेन्ट मोड्यूल फॉर सेकंडरी टू पोस्ट-ग्रॅज्युएट लेव्हल' या विषयावर पीएचडीचे संशोधन पूर्ण केले आहे. नाणकशास्त्र हा विषय शिकविण्यासाठी मणेरी यांनी ई-कन्टेन्ट मोड्यूल विकसित केले आहेत. हे संशोधन करताना त्यांना वेगवेगळ्या कालखंडातील दुर्मिळ ४० नाणी प्राप्त झाली. ती त्यांनी विद्यापीठाच्या संग्रहालयासाठी भेट दिली. मध्ययुगीन कालखंडातील गोल, चौकोनी आकारातील बहुतांश तांब्याच्या नाण्यांचा यात समावेश आहे. पर्शियन (फारसी) लिपीतील मजकूर त्यांवर आहे. १.६ ते १६ ग्रॅमपर्यंतच्या वजनाची ही नाणी आहेत. ही नाणी कुलगुरू डॉ. शिर्के यांनी डॉ. श्रीकांत भोसले यांच्याकडे पुढील कार्यवाहीसाठी सुपूर्द केली. यावेळी नाणे अभ्यासक व संग्राहक नईम शेख, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, डॉ. व्ही. एन. शिंदे, डॉ. सागर डेळेकर, डॉ. प्रतिभा पाटणकर उपस्थित होते.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठासाठी दुर्मिळ नाण्यांचा संग्रह कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्याकडे सुपूर्द करताना अफसाना मणेरी. यावेळी शेजारी डॉ. सागर डेळेकर, प्रतिभा पाटणकर, नईम शेख, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, श्रीकांत भोसले.

## विविध कालखंडातील नाणी

मणेरी यांनी दिलेल्या नाणी सल्तनतींच्या कालखंडातील आहेत. त्यात बहामनी (सन १३४७-१५२८)-१३ नाणी, मुघल काळ (१२३५-१५१७)- ९ नाणी, आदिलशाही (१५५८-१६७२)-५ नाणी, निजामशाही (१५५६-१६३१)-४ नाणी, गोवळकोंडा (१६२६-१६८७), गुजरात सुल्तान (१४११-१५३७), माळवा सुल्तान (१४३६-१५५७)- प्रत्येकी २ नाणी, बिदरशाही (१५०४-१५४२), खान्देश सुल्तान (१५१७-१६०१) आणि जौनपुर सुल्तान (१४४०-१४५६)- प्रत्येकी एक नाणे आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
06 MAR 2024
लोकमत

# संशोधक विद्यार्थिनीकडून विद्यापीठास ४० नाणी भेट

## अफसाना मणेरी यांचे कुलगुरूंनी केले कौतुक

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या शिक्षणशास्त्र अधिविभागातील पीएच.डी. संशोधक विद्यार्थिनी अफसाना हरुण मणेरी यांनी त्यांच्या संशोधनांतर्गत प्राप्त केलेल्या ४० दुर्मीळ नाण्यांचा संग्रह नुकताच विद्यापीठाकडे सुपुर्द केला. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी तो स्वीकारला.

संशोधक विद्यार्थी-विद्यार्थिनी आपल्या संशोधनाद्वारे बौद्धिक संपदेची भर विद्यापीठाच्या ज्ञानसंग्रहामध्ये घालत असतात. पण, त्यापलीकडेही अन्य काही संदर्भ साधने, वस्तू यांचीही भर विद्यापीठाच्या संग्रहामध्ये घालत असतात. त्यामधील ही एक अतिशय मोलाची देणगी आहे, असे उद्गार कुलगुरू डॉ. शिर्के यांनी काढले.

मध्ययुगीन कालखंडातील गोल, चौकोनी आकारातील बहुतांश तांब्याच्या नाण्यांचा यात समावेश आहे. पर्शियन (फारसी) लिपीतील मजकूर त्यावर आहे. १६ ते १८ ग्रॅमपर्यंतच्या वजनाची ही नाणी आहेत.

मणेरी यांनी दिलेल्या नाण्यांमध्ये पुढील सल्तनतींच्या कालखंडातील नाण्यांचा समावेश आहे. बहामनी (सन १३४७-१५२८)- १३ नाणी, मुघल काळ (१२३५-१५१७)- ९ नाणी, आदिलशाही (१५५८-१६७२)- ५ नाणी, निजामशाही (१५५६-१६३१)- ४ नाणी, गोवळकोंडा (१६२६-१६८७), गुजरात सुल्तान (१४११-१५३७), मालवा सुल्तान (१४३६-१५५७)- प्रत्येकी २ नाणी, बिदरशाही (१५०४-१५४२), खान्देश सुल्तान (१५९७-१६०१) आणि जौनपूर सुल्तान (१४४०-१४५६)- प्रत्येकी १ नाणे अशी ४० नाणे विद्यापीठाकडे सुपूर्द करण्यात आला.

अभ्यसपक कक्ष
0 6 MAR 2024 पुण्यनगरी
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठास ४० दुर्मिळ नाणी भेट

## पीएच.डी. संशोधक विद्यार्थिनी अफसाना मणेरी यांनी केली सुपूर्द

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या शिक्षणशास्त्र अधिविभागातील पीएच.डी. संशोधक विद्यार्थिनी अफसाना मणेरी यांनी त्यांच्या संशोधनांतर्गत प्राप्त केलेल्या ४० दुर्मिळ नाण्यांचा संग्रह नुकताच विद्यापीठाकडे सुपूर्द केला. कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांनी तो स्वीकारला.

मणेरी यांनी विद्यापीठाच्या डॉ. प्रतिभा पाटणकर यांच्या मार्गदर्शनाखाली 'डेव्हलपमेंट ऑफ न्यूमिस्मॅटिक्स ई-कन्टेंन्ट मोड्यूल फॉर सेकंडरी टू पोस्ट-ग्रॅज्युएट लेव्हल' या विषयावर संशोधन पूर्ण केले आहे. हे करतानाच त्यांना वेगवेगळ्या कालखंडातील दुर्मिळ ४० नाणी प्राप्त झाली. ती त्यांनी विद्यापीठाच्या संग्रहालयासाठी भेट दिली. मध्ययुगीन कालखंडातील गोल, चौकोनी आकारातील बहुतांश तांब्याच्या नाण्यांचा यात समावेश आहे. तसेच बहामनी (सन १३४७-१५२८)- १३ नाणी, मुघल काळ (१२३५-१५१७)- ९ नाणी, आदिलशाही (१५५८-१६७२)- ५ नाणी, निजामशाही (१५५६-१६३१)- ४ नाणी, गोवळकोंडा (१६२६-१६८७), गुजरात सुल्तान (१४११-१५३७), मालवा सुल्तान (१४३६-१५५७)- प्रत्येकी २ नाणी, बिदरशाही (१५०४-१५४२), खान्देश सुल्तान (१५९७-१६०१) आणि जौनपुर सुल्तान (१४४०-१४५६)- प्रत्येकी १ नाणे त्यांनी दिले आहे.

हा संग्रह म्युझियम कॉम्प्लेक्सचे समन्वयक डॉ. श्रीकांत भोसले यांच्याकडे पुढील कार्यवाहीसाठी सुपूर्द केला. यावेळी नाणे अभ्यासक व संग्राहक नईम शेख, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, कुलसचिव डॉ. विलास शिंदे, इनोव्हेशन, इनक्युबेशन व लिंकेजेस केंद्राचे संचालक डॉ. सागर डेळेकर आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

06 MAR 2024 पुण्यनगरी

# विद्यापीठात लवकरच मर्दानी खेळांचा अभ्यासक्रम

## कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, शिवस्पंदन वार्षीक क्रीडा महोत्सवाला प्रारंभ

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात सन २०२४-२५ या शैक्षणिक वर्षापासून मर्दानी खेळांचा प्रमाणपत्र अभ्यासक्रम सुरू करण्यात येणार असल्याची घोषणा कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांनी केली. शिवाजी विद्यापीठाच्या क्रीडामहर्षी मेघनाथ नागेशकर क्रीडा संकुलाच्या मैदानावर सोमवारपासून चार दिवसीय शिवस्पंदन क्रीडा महोत्सवाला प्रारंभ झाला. त्याच्या उद्घाटन समारंभात ते बोलत होते.



क्रिकेट, बास्केटबॉल, रस्सीखेच, बॅडमिंटन, कबड्डी, बुद्धीबळ, ॲथलेटिक्स आणि मॅरेथॉन या आठ क्रीडा प्रकारांत होणाऱ्या या स्पर्धेत विद्यापीठ कॅम्पसवरील सुमारे १७५० विद्यार्थी-विद्यार्थिनी सहभागी झाले आहेत.

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, शिवकालीन मर्दानी खेळांची परंपरा महाराष्ट्राच्या भूमीत पूर्वापार रुजली आहे. या खेळांना वर्तमानामध्येही महत्त्व आहे. त्या दृष्टीने पुढील वर्षापासून प्रमाणपत्र अभ्यासक्रम आणि त्यानंतर टप्प्याटप्प्याने पदविका आणि पदवी अशा पद्धतीने त्याचा विकास करण्याचा मानस आहे.

यावेळी मान्यवरांच्या हस्ते खेलो इंडिया स्पर्धेत विद्यापीठ संघाला स्पर्धेत ११ वे स्थान प्राप्त करून देणाऱ्या खेळाडूंचा सत्कार करण्यात आला. यामध्ये स्पर्धेत अजिंक्य महिला रग्बी संघासह मल्लखांब संघाचा आणि वैयक्तिक कामगिरी करणाऱ्या अपेक्षा ढोणे (वेटलिफ्टिंग), श्रावणी शेळके (कुस्ती), पृथ्वीराज डांगे (जलतरण), सुमेध सासणे (शूटिंग) यांचा समावेश होता.

गारगोटी तालुक्यातील वेणुग्राम येथील सव्यसाची गुरूकुलमच्या पथकाने लखन जाधव, श्रीकांत लुगडे यांच्या मार्गदर्शनाखाली शिवकालीन मर्दानी खेळांची थरारक प्रात्यक्षिके सादर केली.

यावेळी क्रीडा व शारीरिक शिक्षण संचालक डॉ. शरद बनसोडे यांनी प्रास्ताविक केले. डॉ. एन. डी. पाटील आणि किरण पाटील यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. प्रकाश गायकवाड यांनी आभार मानले. कार्यक्रमास प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, कुलसचिव डॉ. विलास शिंदे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव, डॉ. श्रीकृष्ण महाजन, डॉ. रामचंद्र पवार यांच्यासह डॉ. आय. एच. मुल्ला, डॉ. प्रशांत पाटील, सुभाष पवार, सुरेश धुरे, एन. आर. कांबळे, पी. ए. सरनाईक, सविता भोसले आणि मनीषा शिंदे आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
लोकमत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
6 MAR 2024

# युवा संसद स्पर्धेतील विजेत्यांनी देशविकासात योगदान द्यावे

## डॉ. डी. टी. शिर्के : शिवाजी विद्यापीठात विद्यार्थ्यांचा सत्कार

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : युवा संसद स्पर्धेच्या माध्यमातून मिळालेल्या आत्मविश्वासाच्या बळावर विजेत्या विद्यार्थ्यांनी भावी आयुष्यात देशाच्या विकासामध्ये योगदान द्यावे, असे आवाहन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी केले.

सोळाव्या राष्ट्रीय युवा संसद स्पर्धेमध्ये पश्चिम विभागीय गटात प्रथम क्रमांक मिळवण्याची कामगिरी करणाऱ्या संघातील विद्यार्थ्यांनी कुलगुरू डॉ. शिर्के यांची भेट घेतली. यावेळी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे उपस्थित होते.

१६व्या राष्ट्रीय युवा संसद स्पर्धेचा परितोषिक वितरण समारंभ नवी दिल्ली येथे भारतीय संसदेच्या बालयोगी सभागृहात संसदीय कामकाज राज्यमंत्री अर्जुन राम मेघवाल यांच्या हस्ते पार पडला. शिवाजी विद्यापीठाच्या संघाने दमदार कामगिरी बजावत दुसऱ्यांदा राष्ट्रीयस्तरावर झेप घेतली. विभागात अव्वल कामगिरी केल्यामुळे या कार्यक्रमात विद्यापीठ संघ, समन्वयक आणि उत्कृष्ट सादरीकरण करणाऱ्या आठ विद्यार्थ्यांना पुरस्काराने गौरविण्यात आले.

यावेळी डॉ. प्रल्हाद माने यांनी संघाच्या कामगिरीची माहिती दिली. विद्यार्थी पवन पाटील, प्रतीक्षा कांबळे, प्रतीक्षा पाटील, कृतिका धनगर, आसिया जमादार, श्रेया म्हापसेकर, साईसिमरन घाशी आणि अनमोल पाटील यांनी स्पर्धेद्वारे मिळालेला आत्मविश्वास, संसदेमध्ये वावरताना मनात जागृत झालेली देशप्रेमाची उदात्त भावना याविषयी मनोगत व्यक्त केले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

0 6 MAR 2024

सकाळ

# काम मिळाले... राहण्या-खाण्याचा खर्च भागला

ह्युमन स्टोरी

## विद्यापीठातील कमवा व शिका योजनेचा आधार; सत्तर मुलींच्या उच्च शिक्षणाला गती

नंदिनी नरेवाडी :
सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. ५ : शिवाजी विद्यापीठात कोल्हापूर, सांगली, सातारा या जिल्ह्यांतील विद्यार्थिनी शिक्षणाची आस घेऊन येतात. घरची परिस्थिती बेताची त्यामुळे शिक्षणाचा, राहण्या-खाण्याचा खर्च पेलेल का, असा प्रश्न त्यांच्या मनात येतो; मात्र शिवाजी विद्यापीठात कमवा व शिका योजनेतून त्यांचा हा प्रश्न सुटतो. विद्यापीठातीलच विविध विभागांत दिवसातून तीन तास काम करून राहण्याचा व जेवणाचा खर्च भागतो. या योजनेतून अशा सत्तर मुलींच्या शिक्षणाला गती आली असून, त्यांचे उच्च शिक्षण सुखर बनले आहे. यापैकीच ही काही प्रातिनिधिक उदाहरणे...



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या उद्यानात झाडांची काळजी घेताना शीतल देवाळे. २) कमवा व शिका योजनेतील कार्यालयीन काम सांभाळणारी अनिता गुळीक. ३) आवक जावक विभागात कार्यरत असणाऱ्या निकिता कडाळे व स्वाती बुरुटे. (बी. डी. चेचर : सकाळ छायाचित्रसेवा)

माण, दहीवडी या दुष्काळग्रस्त भागातून संरक्षण क्षेत्रात भरती होण्याचे स्वप्न घेऊन आलेली अनिता गुळीक मराठी एमएच्या पहिल्या वर्षात शिकते. कमवा व शिका योजना होस्टेलचे कार्यालयीन काम सांभाळते. दुष्काळी भाग असल्याने कुटुंबाच्याच जगण्याचा प्रश्न तिथे उच्च शिक्षणासाठी पैसा कसा उभा राहणार, याच विचारातून तिने कमवा व शिकाची वाट चोखाळली आणि तिच्या स्वप्नांना बळ मिळाले. गारगोटीवरून आलेली शीतल देवाळे मॅथॅमॅटिक्स विषयातून एमएस्सी पूर्ण करत आहे. दिवसभर लेक्चर असल्याने सकाळी सहा ते नऊ विद्यापीठाच्या बागेत काम करते. भांगलण करणे, रोपे लावणे, झाडांना पाणी घालणे ही कामे न लाजता करते.

कवळे महांकाळची निकिता कडाळे राज्यशास्त्रातून राजकीय क्षेत्राचा अभ्यास करते. घरी आई - वडील शेती करतात. त्यांच्यावर दोन बहिणी आणि भाऊ यांच्याही पालनपोषणाची जबाबदारी आहे. आपल्या शिक्षणाचा भार त्यांच्यावर नको म्हणून सध्या ती विद्यापीठाच्या आवक - जावक विभागात टपालाच्या नोंदी ठेवते. स्वाती बुरुटे ही जत, सांगलीची. तिला पोलिस दलात पीएसआय व्हायचे आहे. याची तयारी अजून सुरू केली नसली तरी राज्यशास्त्रातून पदव्युत्तर पदवी घेत या प्रवासाला तिने सुरुवात केली आहे. तीही विद्यापीठातील आवक - जावक विभागात कार्यरत आहे.

> ग्रामीण भागातून आलेल्या या मुलींच्या शिक्षणाचा खर्च झेपणारा नसतो. गावी गेले तर लग्न करतील यातून करिअर घडवता येणार नाही, अशीच परिस्थिती या मुलींसमोर असते. त्यामुळे कमवा व शिका योजनेतून मुलींना राहण्याचा, जेवणाचा खर्च विद्यापीठ देते. यामुळे मुलींचे शिक्षणही सुरू राहते आणि त्यांच्या उज्ज्वल भविष्याचा मार्ग सुकर होतो. त्यामुळे यापूर्वी योजनेत फक्त चाळीस मुलींचा समावेश होता. याला मिळणारा प्रतिसाद पाहून यंदा ही संख्या वाढवून ७० केली आहे.
>
> **- प्रा. डॉ. माधुरी वाळवेकर,** समन्वयक, कमवा शिका योजना

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
06 MAR 2024
पुढारी

# पदवी स्तर प्रथम-द्वितीय वर्षांच्या परीक्षा २६ पासून

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्या वतीने पदवी स्तरावरील अभ्यासक्रमांच्या प्रथम, द्वितीय वर्ष अभ्यासक्रमांच्या



**शिवाजी विद्यापीठातून**

- **विद्यापीठ कार्यक्षेत्रातून सुमारे १ लाख ५० हजार विद्यार्थी**

परीक्षा महाविद्यालय स्तरावर २६ मार्च ते ३० एप्रिल या कालावधीत घेण्यात येणार आहेत.

विद्यापीठाने शैक्षणिक वर्ष २०२३-२४ पासून पदवी स्तरावरील अभ्यासक्रमांच्या प्रथम व द्वितीय वर्षाच्या सर्व परीक्षांचे (वेळापत्रक, प्रश्नपत्रिका आयोजन, परीक्षा आयोजन व मूल्यमापन) महाविद्यालय स्तरावर आयोजन करण्यास विद्यापीठ अधिकार मंडळाने मान्यता दिली आहे. त्यानुसार मार्च-एप्रिल उन्हाळी सत्रातील परीक्षा होणार आहेत. परीक्षेला विद्यापीठ कार्यक्षेत्रातील महाविद्यालयांतून सुमारे १ लाख ५० हजार विद्यार्थी बसणार आहेत. परीक्षा कालावधीत महाविद्यालयाने वेळापत्रक प्रसिद्ध करणे, प्रश्नपत्रिकांचे आयोजन, परीक्षा आयोजन तसेच उत्तरपत्रिकांचे मूल्यमापन करून उपलब्ध करून देण्यात आलेल्या संगणक प्रणालीमध्ये गुण भरणे याची संपूर्ण कार्यवाही करावी. परीक्षेची कार्यपद्धती व नियमावली www.unishivaji.ac.in- Exam Section - Circular या ठिकाणी उपलब्ध आहे, अशी माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी दिली.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
06 MAR 2024
पुढारी

# विवेकानंदला उत्कृष्ट महाविद्यालय पुरस्कार

कोल्हापूर : राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी श्रीकांत देशपांडे यांच्या हस्ते विवेकानंद महाविद्यालयास उत्कृष्ट महाविद्यालय पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. शिवाजी विद्यापीठात झालेल्या कार्यक्रमात प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांनी पुरस्कार स्वीकारला. यावेळी अतिरिक्त जिल्हाधिकारी संजय शिंदे, पन्हाळा प्रांत अधिकारी समीर शिंगटे, उपजिल्हाधिकारी समाधान शेंडगे, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील उपस्थित होते. जिल्हा नोडल अधिकारी म्हणून विवेकानंद कॉलेजचे रा. से. योजना कार्यक्रम अधिकारी प्रा. संदीप पाटील यांना उत्कृष्ट संपर्क अधिकारी पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. यावेळी राज्यशास्त्र विभागप्रमुख समीक्षा फराकटे उपस्थित होत्या. यशाबद्दल संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे , संस्था सेक्रेटरी प्राचार्या शुभांगी गावडे, सीईओ कौस्तुभ गावडे यांनी अभिनंदन केले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
06 MAR 2024
पुढारी

# सुशांतची विद्यापीठ क्रॉसकंट्री संघात निवड

कोवाड : कोवाड (ता. चंदगड) येथील कला, वाणिज्य आणि विज्ञान



महाविद्यालयातील सुशांत मनोहर जेधे याने शिवाजी विद्यापीठात घेण्यात आलेल्या १० कि.मी. धावणे क्रॉसकंट्री स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळविला. त्यांची एसआरटीएम विद्यापीठ नांदेड येथे होणाऱ्या अखिल भारतीय विद्यापीठ क्रॉसकंट्री स्पर्धेसाठी शिवाजी विद्यापीठाचा क्रॉसकंट्री संघात निवड झाली आहे. त्याला प्रा. आर. टी. पाटील यांचे मार्गदर्शन मिळाले. या निवडीबद्दल सर्वोदय शिक्षण संस्थेचे अध्यक्ष डॉ. ए. एस. जांभळे, सचिव एम. व्ही. पाटील, प्राचार्या डॉ. एम. एस.पवार यांनी अभिनंदन केले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
06 MAR 2[illegible]
Times of India

# Five-day state-level youth festival at Bamu from March 11

TIMES NEWS NETWORK

**Chhatrapati Sambhajinagar:** Dr Babasaheb Ambedkar Marathwada University (Bamu) is all set to host Indradhanushya, a state-level youth festival, on its campus from March 11.

The five-day event will witness participation of 24 teams from different universities and institutes of higher learning across Maharashtra. Pro-vice chancellor of Bamu Walmik Sarwade said a total of 875 students will take part in the mega event.

"The youth festival will be held in 29 different art forms. Preparations are on in full swing to make the event memorable for all the participating students," he said.

The state-level youth festival was initiated at the behest of the office of state governor and chancellor of the state universities that has declared Bamu as the host for this year's event.

Students, who have enrolled for a degree or post-graduate degree or diploma course of a minimum duration of one-academic year and whose examination is conducted by the state university after passing the Std XII or equivalent examination, are considered eligible for participation.

"The strength of each contingent per university cannot be more than 50," the university said in a statement.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

0 6 MAR 2024

पुण्यनगरी

विज्ञान-तंत्रज्ञान


डॉ. व्ही.एन. शिंदे

# ...चंद्रावर बंगला!

काही वर्षांपूर्वी जगदीश खेबुडकर अर्थात नानांनी लिहिलेले 'गोंधळात गोंधळ' चित्रपटातील अशोक सराफ आणि रंजना यांच्यावर चित्रीत झालेले आणि सुरेश वाडकर आणि अशा भोसले यांनी स्वरबद्ध केलेले गाणे खूप गाजले होते. गाण्याचे बोल होते 'मंगला ग मंगला..., तुझ्यासाठी चंद्रावर बांधीन मी ग बंगला.' हे गीत लिहिताना खेबुडकर यांना चंद्रावर वस्ती होऊ शकेल याचा अंदाज आला होता असे मानायला हरकत नाही, कारण 'जे न देखे रवी, ते ते देखे कवी.' विज्ञानाच्या तत्कालीन संशोधनाच्या टप्प्यावर संशोधक मात्र हे मानायला कदापि तयार झाले नसते. मात्र, खेबुडकरांनी मंगलाच्या प्रियकराला चंद्रावर बंगला बांधायचे अभिवचन त्याच्या प्रेयसीला द्यायला लावले होते. आज मानवाने विज्ञान आणि तंत्रज्ञानातील प्रगतीच्या सहाय्याने ते वास्तवाजवळ आणले आहे.

मागील काही दिवस चंद्र सातत्याने चर्चेत आहे. अनेक राष्ट्रांनी चंद्रावर जाण्यासाठी चांद्रमोहिमा आखल्या आहेत. जणूकाही प्रत्येक राष्ट्राला चंद्रावर जाण्याची घाई झाली आहे. या स्पर्धेमागे चंद्रावर वसाहत निर्माण करण्याचे स्वप्न आहे. भारताच्या चांद्रमोहिमेच्या मागोमाग आणखी दोन चांद्रयाने चंद्रावर पोहोचली. जपानचे 'स्लीम लँडर' आणि अमेरिकेच्या खाजगी कंपनीचे 'ओडिसियस' हे यान उतरले. विशेष म्हणजे ५२ वर्षांनंतर अमेरिकेचे यान चंद्रावर उतरले. अमेरिका पुन्हा स्पर्धेत उतरली आहे. येत्या काही वर्षात महिला अंतराळवीरांना चंद्रावर पाठवण्याचा अमेरिकेचा मानस आहे. चीन आणि भारतही अंतराळवीरांना चंद्रावर पाठवण्यासाठी मोहीम आखत आहेत. आजवर अमेरिका, रशिया, चीन, भारत आणि जपानलाच चंद्रावर यान उतरवण्यात यश मिळाले आहे. अमेरिकेलाच केवळ मानव उतरवण्यात यश मिळाले आहे.

चंद्रावर यान पाठवण्याचे प्रयत्न पहिल्या महायुद्धानंतर सुरू झाले. त्या वेळी विज्ञान आणि तंत्रज्ञानात आघाडी घेण्याची अमेरिका आणि रशिया यांच्यात स्पर्धा सुरू होती. या स्पर्धेत रशियाने आघाडी घेतली आणि १९५९ साली रशियाने लुना-१ हे यान चंद्राच्या कक्षेत पाठवले. पाठोपाठ दोन वर्षात पहिला अंतराळवीर युरी गागारीनला अवकाशात पाठवले. रशियाच्या यशामुळे अमेरिकेवर दबाव वाढला. अमेरिकेला



रशियापेक्षा भव्य यश हवे होते. या ईर्षेतून अमेरिकेने १९६९ साली 'अपोलो-११' यानातून नील आर्मस्ट्रॉंग आणि अल्विन ऑल्ड्रीच या अंतराळवीरांना चंद्रावर उतरवले. पाठोपाठ अमेरिकेने आणखी दहा अंतराळवीरांना अवकाशात पाठवले. हे अमेरिकेचे वैज्ञानिक यशासोबत राजकीय यशही होते.

दुसरीकडे आजवर रशियाला चंद्रावर पाऊल टाकणे शक्य झालेले नाही. रशियाने ऑगस्ट २०२३ मध्ये ल्युना-२५ या यानाच्या सहाय्याने चंद्रावर यान उतरवण्याच्या प्रयत्न केला, पण तो अयशस्वी झाला. भारताने चांद्रमोहीम-३ च्या माध्यमातून विक्रम लँडर चंद्रावर उतरवले. दक्षिण ध्रुवावर विक्रम उतरल्याचा तो क्षण ऐतिहासिक ठरला.

जपानने १९ जानेवारी १९२४ मध्ये 'स्लीम' यानाच्या सहाय्याने आपले लँडर चंद्रावर उतरवले. जपानच्या या मोहिमेला संमिश्र यश मिळाले. त्या पाठोपाठ अमेरिकेच्या एका खाजगी कंपनीने २३ फेब्रुवारी २०२४ रोजी ओडिसियस या यानाच्या सहाय्याने आपले लँडर चंद्रावर उतरवले. चंद्रावर उतरणारे हे पहिले खाजगी यान आहे.

चांद्रमोहिमांच्या सुरुवातीला रशिया आणि अमेरिकेत स्पर्धा सुरू होती. आज चीन आणि अमेरिकेत स्पर्धा सुरू झाली आहे. या स्पर्धेत उघड नसला तरी भारत तिसरा स्पर्धक आहे. ही स्पर्धा सुरू आहे ती चंद्रावर मानवी वसाहत निर्माण करण्यासाठी.

पण चंद्रच का? इतर ग्रहांचा का विचार केला जात नाही? याचे उत्तर म्हणजे चंद्र पृथ्वीच्या जवळ आहे. चंद्रावर जाण्यासाठी अवघे तीन दिवस लागतात. तुलनेने मंगळावर जाण्यासाठी सहा ते आठ महिने लागतात. चंद्रावरील गुरूत्वीय बलही पृथ्वीच्या केवळ सहावा भाग इतके कमी आहे. त्यामुळे चंद्र हाच सर्वांचे लक्ष बनला आहे. मात्र, तरीही चंद्रावर जाणे एवढे सोपे नाही.

सर्वात महत्त्वाचे म्हणजे मानवासह जाणारे यान पाठवण्यासाठी अत्यंत शक्तिशाली रॉकेटची गरज असते. अशी उत्तम दर्जाची रॉकेट तयार करण्याचे तंत्रज्ञान सध्या अमेरिकेकडे आहे. असे रॉकेट अंतराळात पाठवताना अंतराळवीरांचे अंतराळातील प्रारणांपासून (रॅडिएशन) संरक्षण करणे, हेही अत्यंत कठीण काम असते. चंद्रावर लँडर उतरवण्यासाठी सपाट आणि चांगली जागा शोधणे आणि त्या ठिकाणी ते उतरवणे किती कठीण असते, हे आपण दूरचित्रवाणी संचावर भारताच्या चांद्रयान-३ मोहिमेच्या यशावेळी पाहिले आहे.

यान उतरवण्यापेक्षा कठीण असते, ते म्हणजे चंद्रावरून सुरू करावयाचा परतीचा प्रवास. चंद्रावरून परत रॉकेटच्या सहाय्याने यान उडवणे आणि ते परत सुखरूप पृथ्वीवर आणणे, हा सर्वाधिक कठीण भाग असतो. पृथ्वीवर यान प्रक्षेपित करताना आपणास कोणत्याही क्षणी त्रुटी जाणवली तर लगेच प्रक्षेपण थांबवता येते. मात्र, चंद्रावर चुकीला माफी नाही. सर्व काही स्वयंचलित असते. थोडीशी त्रुटीही यंत्रणा निकामी बनवू शकते. तसेच यान जेव्हा पृथ्वीच्या कक्षेत येते, तेव्हा यानाचे तापमान खूप वाढलेले असते. यान हवेतच जळून जाऊ नये यासाठी त्या भोवती उष्मारोधक कवच असणे आवश्यक असते. यासाठी अब्जावधी रुपये खर्चावे लागतात.

अनंत अडचणी असल्या तरी त्यावर मात करत चंद्रावर जायचेच, या ईर्षेने चीन आणि अमेरिका पेटून उठले आहेत. चंद्रावर काही दिवस राहता येईल आणि तेथे संशोधन करता येईल असे केंद्र उभे करण्याचे प्रयत्न सुरू आहेत. यामध्ये एलॉन मस्क आघाडीवर आहेत. जगातील ३६ देशांना यामध्ये रस आहे. त्यांनी एक करारही केला आहे. यामध्ये भारतही आहे. चंद्रावर संशोधन करणे, तेथे उपलब्ध असलेल्या साधनसंपत्तीच्या विनियमासाठी नियमावली बनवण्याचा यामध्ये समावेश आहे. काही कंपन्यांना चंद्रावरील खनिजांमध्ये रस आहे. तेथे त्यांना खाणी खोदायच्या आहेत. त्यातील दुर्मीळ खनिजे पृथ्वीवर आणायची आहेत. अमेरिकेच्या नेतृत्वाखालील ३६ देशांचा गट एकीकडे प्रयत्न करत असताना, काही उद्योजक चीनला रसद पुरवत आहेत. चीनने यापूर्वी हे क्षेत्र खाजगी उद्योजकांना खुले केले आहे.

चंद्राचा व्यावसायिक विचार होतोय. पुढचे चित्र स्पष्ट दिसत आहे. नानांचे गाणे प्रत्यक्षात उतरताना, प्रेयसीच्या चेहऱ्याला चंद्राची उपमा देण्याचे दिवस सरताना दिसत आहेत.

vilasshindevs44@gmail.com
संपर्क : ९६७३७८४४०७